# हॅलो नाशिक

लोकमत

नाशिक, शुक्रवार, दि. २ डिसेंबर २०१६


तीन कांड लवकरच ग्रंथस्वरुपात : धुळ्याच्या संस्थेकडून रामदास स्वामींची ग्रंथसंपदा जतन

# समर्थांच्या 'वाल्मीकी रामायणा'चे डिजिटलायझेशन

**नाशिक :** समर्थ रामदास स्वामींनी नाशिकच्या टाकळी मठातील वास्तव्य काळात ३९५ वर्षांपूर्वी स्वहस्ताक्षरात लिहिलेल्या 'वाल्मीकी रामायण'चे दस्तावेज सापडले बीडच्या मठात. विदर्भाचे टिळक म्हणून ओळखले जाणारे शंकरराव तथा नानासाहेब देव यांनी हा ऐतिहासिक ठेवा ८१ वर्षांपूर्वी आणला तो धुळ्यात. सद्यस्थितीत धुळे येथील श्री समर्थ वाग्देवता ज्ञानमंदिरात जतन करून ठेवण्यात आलेल्या या वाल्मीकी रामायणातील सात कांडपैकी पहिले 'बालकांड' ग्रंथरुपात मागील वर्षी प्रसिद्ध झाले. आता पुढील अरण्यकांड, अयोध्याकांड आणि सुंदरकांड ग्रंथस्वरुपात येत्या तीन-चार महिन्यांत वाचकांच्या भेटीला येणार आहेत. समर्थांच्या ऐतिहासिक दस्तावेजांचे डिजिटलायझेशन करण्याचे काम संस्थेमार्फत सुरु आहे.

समर्थ रामदास स्वामींनी नाशिकच्या टाकळी मठात इ.स. १६२० ते १६३३ अशी साधारण बारा वर्षे कठोर तपसाधना केली. याचदरम्यान, वय वर्षे चौदा असलेल्या रामदासांनी वाल्मीकी रामायणातील बालकांड संस्कृतमध्ये लिहून काढले. त्यानंतर त्यांनी अयोध्या, अरण्य, किष्किंधा, सुंदर ही चार कांडे नाशिकमध्येच १६२४ पर्यंत लिहून पूर्ण केली. पुढे युद्ध व उत्तरकांड त्यांनी साताऱ्यातील मसूरमध्ये पूर्ण केल्याचे सांगितले जाते. समर्थांच्या हस्ताक्षरातील हे अमूल्य दस्तावेज नेमके कोठे आहेत, याचा पत्ता लागत नव्हता. परंतु, १९३५ मध्ये 'विदर्भाचे टिळक' म्हणून ओळखले जाणारे



शंकरराव तथा नानासाहेब देव यांना त्याचा शोध बीडच्या मठात लागला आणि त्यानंतर समर्थांचे रामायण धुळ्यातील वाग्देवता मंदिरात आजतागायत सुरक्षितपणे जतन करुन ठेवण्यात आले आहे. समर्थांच्या या ग्रंथसंपदेचे संस्थेच्या विश्वस्तांनी अतिशय परिश्रमपूर्वक डिजिटालायझेशन सुरु केलेले आहे. याशिवाय, मागील वर्षी मे २०१५ मध्ये पहिले 'बालकांड' ग्रंथस्वरुपातही प्रसिद्ध करण्यात आले आहे. आता संस्थेने अरण्य, अयोध्या आणि सुंद[र] या तीन कांडांचे काम सुरु केले आहे.

> समर्थ रामदास स्वामींच्या अमूल्य दस्तावेजांचे चिरंतन जतन व्हावे यासाठी संस्थेमार्फत काम सुरु आहे. आतापर्यंत दोन लाख इमेजेसचे काम पूर्ण झाले आहे. टाकळी मठाशी संबंधित काही बाडं उपलब्ध होती ती टाकळी देवस्थानकडे सीडी स्वरुपात सुपूर्द केली आहेत. सदर देवस्थानने समर्थांच्या साहित्यावर संशोधन होण्यासाठी अभ्यासकेंद्राची उभारणी करायला हवी.
>
> **- शरद कुबेर**, अध्यक्ष, श्री समर्थ वाग्देवता मंदिर, धुळे

» उर्वरित / पान २ व[र]

# समर्थांच्या 'वाल्मीकी रामायणा'चे डिजिटलायझेशन

(पान १ वरुन)

तीनही कांड येत्या तीन-चार महिन्यांत ग्रंथस्वरुपात वाचकांच्या भेटीला येणार असल्याची माहिती संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. दे. दि. डोंगरे यांनी 'लोकमत'शी बोलताना दिली.

नाशिकमधील टाकळी येथील समर्थ रामदास स्वामींचा मठ हे ऐतिहासिक स्थान आहे. समर्थांनी स्थापन केलेला हा पहिला मठ आहे. त्यामुळे त्याचे महत्त्व अधिक आहे. याच टाकळी मठाशी संबंधित काही बाडं धुळ्याच्या श्री समर्थ वाग्देवता मंदिरात उपलब्ध आहेत.

ती अभ्यासकांसह समर्थ भक्तांना उपलब्ध व्हावी याकरिता संस्थेने सुमारे ५० बाडांचे डिजिटलायझेशन करत त्याच्या १७ सीडी डीव्हीडी स्वरुपात उपलब्ध करुन दिल्या आहेत. संस्थेचे अध्यक्ष शरद कुबेर व कार्याध्यक्ष प्रा. डोंगरे यांनी नुकताच हा ऐतिहासिक ठेवा सीडीच्या स्वरुपात टाकळी देवस्थानचे अध्यक्ष व अतिरिक्त सत्र न्यायाधीश एन. के. ब्रह्मे यांच्याकडे विश्वस्त ज्योतिराव खैरनार, सुधीर शिरवाडकर व प्रकाश पवार यांच्या उपस्थितीत सुपूर्द केला.

४३ वर्षांच्या प्रदीर्घ न्यायालयीन लढाईनंतर टाकळी देवस्थानात पहिले पंचवार्षिक विश्वस्त मंडळ २०१२ मध्ये स्थापन झाले. या मंडळामार्फत आता टाकळी देवस्थानात विविध उपक्रमांचे सातत्याने आयोजन केले जात आहे.

## अभ्यासकांना मोफत सेवा

> धुळे येथील समर्थ वाग्देवता मंदिर या संस्थेने समर्थांच्या साहित्याचे जतन करुन ठेवले आहे. टाकळी मठाशी संबंधित त्यांनी सीडीच्या स्वरुपात उपलब्ध करुन दिलेला ऐतिहासिक ठेवा अभ्यासण्यासाठी टाकळी मठात समर्थ भक्तांना मोफत उपलब्ध करुन देण्याची घोषणा अध्यक्ष न्या. एन. के. ब्रह्मे यांनी केलेली आहे. त्यासाठी आवश्यक संगणक, लॅपटॉप, स्वतंत्र कक्ष आदि सुविधाही उपलब्ध करुन दिली जाणार आहे. तसेच या ३५०० पृष्ठांची हार्ड कॉपी समर्थ भक्तांना विक्रीसाठीही उपलब्ध करुन दिली जाणार आहे.
>
> **- ज्योतिराव खैरनार**, विश्वस्त, टाकळी देवस्थान, नाशिक